# रे. दर. नंबर १२/२०२२ मधील निशाणी १३ वरील आदेश

(संजय लक्ष्मण यादव विरुध्द लक्ष्मण श्रीपती यादव)

दरखास्ताराने सदरचा अर्ज घर मिळकतीचे वाटप होवून मिळण्यासाठी कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करण्यासाठी दाखल केला आहे. सदर अर्जावर जे. डी. यांनी म्हणणे दाखल केले नाही. सदरचा अर्ज जे. डी. यांच्या म्हणण्याविना चालविणेत आला.

०२. दरखास्तदारातर्फे विधीज्ञ श्री. पी. के. गायकवाड यांचा युक्तिवाद ऐकला.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. दरखास्तदार यांनी कोर्ट कमिशन फी भरणेस तयार असल्याचे अर्जात कथन केले आहे. नि.क्र.१४ वर दरखास्तदार यांनी कोर्ट कमिशनकरीता विधीज्ञ श्री. एम. एस. नांगरे यांचे नांव सुचित करुन पुरशिस दाखल केली आहे. त्याकरीता दावा कलम १ ब मधील मिळकत मौजे डेरवण, तालुका – पाटण येथील ग्रामपंचायत हद्दीतील घर मिळकत ग्रामपंचायत मिळकत नंबर ७६ च्या वाटपासाठी कोर्ट कमिशनर म्हणून विधीज्ञ श्री. एम. एस. नांगरे यांची नेमणूक करणे न्यायोचित होणार आहे. त्याकरीता आदेश –

## आदेश

१. दरखास्तदार यांचा निशाणी १३ चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. विधीज्ञ श्री. एम. एस. नांगरे यांची दावा कलम १ ब मधील मिळकत मौजे डेरवण, तालुका – पाटण येथील ग्रामपंचायत हद्दीतील घर मिळकत ग्रामपंचायत मिळकत नंबर ७६ या मिळकतीचे वाटप कामाकरीता कोर्ट कमिशनच्या कामी नियुक्ती करण्यात येते.

३. कोर्ट कमिशनर यांनी घर मिळकतीच्या जागेवर जावून दरखास्तीमधील सर्व पक्षकारांना नोटीस काढून, नियमीत दिवाणी दावा क्रमांक १३८/२०१५ यामधील हुकूमनाम्याप्रमाणे वाटप काम सुचवून, वाटपाचे मोजमाप करुन, तसा अहवाल व नकाशा यामध्ये स्पष्ट उल्लेख व वर्णन करुन दाखल करावा, असा आदेश देण्यात येतो.

४. कोर्ट कमिशनर यांनी कोर्ट कमिशन करण्यापूर्वी दरखास्तीमधील सर्व पक्षकारांना नोटीस दयावी.

५. दरखास्तदार व जे. डी. यांनी कोर्ट कमिशनर यांना संबंधित कागदपत्रे व दस्तऐवज देवून कोर्ट कमिशन कामी सहकार्य करावे.

६. दरखास्तदार यांनी सदर कोर्ट कमिशन कामाचा सर्व खर्च सोसावा.

७. दरखास्तदार यांनी कोर्ट कमिशनर यांची फी म्हणून रक्कम रुपये ३,०००/– (रुपये तिन हजार फक्त) कोर्ट कमिशनर यांना द्यावी.

८. कोर्ट कमिशनर यांनी घर मिळकतीच्या वाटपाबाबतचा नकाशा व अहवाल दोन महिन्याच्या आत दाखल करावा, असा आदेश करणेत येतो.

९. सदर आदेशानुसार कोर्ट कमिशनर यांना कमिशनकामी पत्र देण्यात यावे.

१०. दरखास्तदार व जे. डी. यांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by CHETNA YASHWANT NEWARE
Date: 2024.11.19 15:04:52 +0530

पाटण, जिल्हा सातारा. (चेतना य. नेवारे)

दि.१२.११.२०२४. सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, पाटण.